## भाग दुसरा
====x====

## -: शेतमजुरांची बचत :-
=========x===

**५·१·० :**

या प्रकरणातील पहिल्या भागात शेतमजुरांच्या खर्चाची माहिती आपण पाहिली आहे. या भागात शेतमजुरांच्या बचतीची माहिती द्यावयाची आहे. हे करीत असताना (१) शेतमजुरांचे उत्पन्न (२) शैक्षणिक पातळी (३) जमिनीचे आकारमान (४) कुटुंबाचे आकारमान या चार घटकांच्या आधारे बचतीचे पृथ्थकरण करुन आपणास शेतमजुरांच्या बचतीबद्दल निष्कर्ष काढता येतील.

**५·१·१ :**

शेतमजुरांच्या उत्पन्नावरुन त्यांच्या बचतीचे विवेचन करण्यासाठी त्यांचे उत्पन्न प्रमाण (१) ३,००० ते ४,५०० रुपये (२) ४,५०१ ते ६,००० रुपये व (३) ६,००१ ते ९,००१ रुपयांपेक्षा जास्त असे तीन गट पाडून बचतीचा आढावा घेतला आहे.

**५·१·१·अे :**

अल्पभूधारक शेतमजुरांच्या (९३) बचतीचा विचार करता आपणास असे आढळून येते की ५८ (६२·३७ टक्के) शेतमजूर बचत करीत नाहीत.

**अे·१ :**

३,००० ते ४,५०० रुपये उत्पन्न गटामधील १७ (१८·२८ टक्के) शेतमजुरांपैकी तेरा (७६·४७ टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत. तर तीन (१७·६५

टक्के) शेतमजूर बँकेत बचत खात्यावर पैसे ठेवणारे व तीन (१७·६५ टक्के) शेतमजूर भिशीमध्ये बचत करीत आहेत·

अ·२ :

४,५०१ ते ६,००० रुपये उत्पन्न गटाती ३९ (४१·९४ टक्के) शेतमजूरांपैकी अठ्ठावीस (७१·७९ टक्के) बचत न करणारे, नऊ (२३·०८ टक्के) शेतमजूर बँकेमध्ये बचत खात्यावर, दोन (५·१३ टक्के) भिशीमध्ये तर एक (२·५६ टक्के) शेतमजूर पोष्ट ऑफीसामध्ये बचत करतात·

अ·३ :

६,००१ ते ९,००१ रुपयांपेक्षा जास्त - या उत्पन्न गटातील सदतीस (३९·७८ टक्के) शेतमजुरांपैकी सतरा (४५·९५ टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत· बचत करणाऱ्यांपैकी चौदा (३७·८४ टक्के) बँकांमध्ये बचत करतात· यापैकी दोन (१४·२९ टक्के) शेतमजुरांनी बँकेमध्ये मुदत खात्यावर बचत केली आहे· तीन (८·११ टक्के) पोष्ट ऑफीसामध्ये बचत करतात· तर चार (१०·८१ टक्के) शेतमजूर भिशीमध्ये बचत करतात असे दिसून येते·

५·१·१·बी :

भूहीन बावीस शेतमजुरांच्या बचतीचा आढावा वरील तीन उत्पन्न गटावरुन पुढीलप्रमाणे घेता येईल·

बी·१ :

३,५०० रुपये ते ४,५०० रुपये उत्पन्न गटातील पाच (२२·७३ टक्के) भूहीन शेतमजुरांपैकी तीन (६० टक्के) बचत न करणारे आहेत· तर बचत

करणा-यांपैकी एक (२० टक्के) बँकेत बचत खात्यावर व एक (२० टक्के) भिशीमध्ये बचत करताना दिसून येतात.

बी.२ :

४,५०१ ते ६,००० रुपये उत्पन्न गटामधील आकरा (५० टक्के) शेतमजुरांपैकी आठ (७२.७३ टक्के) शेतमजूर बचत न करणारे तर बचत करणारे सर्व तीन (२७.२७ टक्के) शेतमजूर बचत खात्यावर बँकेमध्ये बचत करतात.

बी.३ :

६,००१ ते ९,००० रुपयापर्यंतच्या उत्पन्न गटामध्ये असणा-या सहा (२७.२७ टक्के) शेतमजुरांमधील पाच (८३.३३ टक्के) शेतमजूर बचत न करणारे तर बचत करणारा एक (१६.६७ टक्के) शेतमजूर बँकेमध्ये बचत खात्यावर पैसे जमा करतो.

५.१.१.सी :

खंडकरी पाच शेतमजुरांच्या बचतीचे पृथ्थकरण त्यांच्या उत्पन्न गटांवरुन पुढीलप्रमाणे करता येईल.

सी.१ :

५,००१ ते ६,००० रुपये पर्यंत या उत्पन्न गटातील दोन्ही (४० टक्के) शेतमजूर कोणत्याही प्रकारची बचत न करणारे आहेत.

सी.२ :

७,००१ ते ९,००० रुपयापर्यंतच्या उत्पन्न गटांमधील तीन (६० टक्के) शेतमजुरांपैकी दोन (६६.६७ टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत. तर

बचत करणारा एक (३३·३३ टक्के) शेतमजूर बँकेमध्ये बचत खात्यावर बचत करतो·

५·१·२ :

सर्वेक्षणातील १२० शेतमजुरांपैकी ७८ (६५ टक्के) शेतमजूर कोणतीही बचत करीत नाहीत· बचत करणाऱ्यांचे प्रमाण ३५ टक्के इतकेच आहे· तेहतीस जण (७८·५७ टक्के) बँकेत बचत करतात· चौघे (९·५२ टक्के) पोष्टात व नऊ (२१·४२ टक्के) भिशीमध्ये आपली बचत जमा करतात· फक्त दोघांची मुदती खाती जमा आहे· तर पस्तीस जण आपली पुंजी बचत खात्यात ठेवतात·

५·१·२·अे :

शेतमजुरांच्या बचतीची माहिती शेतमजुरांच्या शैक्षणिक पातळी-वरून पुढीलप्रमाणे मांडता येते· शैक्षणिक पातळीनुसार शेतमजुरांचे (१) अशिक्षित (२) प्राथमिक (३) माध्यमिक व उच्च माध्यमिक असे गट पाडून पुढीलप्रमाणे आढावा घेता येईल·

अल्पभूधारक शेतमजुरांच्या बचतीचे पृथ्थकरण त्यांच्या शैक्षणिक गटानुसार पुढीलप्रमाणे करता येईल·

अे·१ : अशिक्षित :-

या गटामधील ३८ (४०·८६ टक्के) शेतमजुरांपैकी चोवीस (६३·१६ टक्के) शेतमजूर बचत करीत नाहीत· बचत करणाऱ्यातील नऊ (२३·६८ टक्के) शेतमजूर बँकेत, एक (२·६३ टक्के) शेतमजूर पोष्ट ऑफीसमध्ये बचत खात्यावर बचत करतात· तर चार (१०·५३ टक्के) शेतमजूर भिशीमध्ये बचत करतात·

अे·२ : प्राथमिक :-

प्राथमिक शिक्षण घेणा-या ४४ (४७·३१ टक्के) शेतमजुरांपैकी सव्वीस (५९·०९ टक्के) शेतमजूर बचत न करणारे, सतरा (३८·६४ टक्के) शेतमजूर बँकेत बचत करतात· यामधील सोळा (९४·१२ टक्के) शेतमजूर बचत खात्यावर तर एक (५·८८ टक्के) शेतमजूर मुदत खात्यावर बचत करतात· एक (२·२७ टक्के) शेतमजूर पोष्ट ऑफीसमध्ये तर चार (९·०९ टक्के) शेतमजूर भिशीमध्ये बचत करतात·

अे·३ : माध्यमिक व उच्च माध्यमिक :-

माधामिक व उच्च माधामिक या शैक्षणिक गटामध्ये येणा-या आकरा (११·८३ टक्के) शेतमजुरांमधील आठ (७२·७३ टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत· बचत करणा-यांपैकी दोन (१८·१८ टक्के) शेतमजूर पोष्ट ऑफीसामध्ये बचत करतात· तर एक (९·०९ टक्के) शेतमजूर बँकेत मुदत खात्यावर बचत करतात·

५·१·२·बी :

भूहीन शेतमजुरांच्या बचतीचे पृथ्थकरण त्यांच्या शैक्षणिक गटानुसार पुढीलप्रमाणे करता येईल·

बी·१ :

अशिक्षित शैक्षणिक गटांमधील सात (३१·८२ टक्के) शेतमजुरांपैकी पाच (७१·४३ टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत· तर बचत करणा-या दोन (२८·५७ टक्के) शेतमजुरांपैकी प्रत्येकी एक (५० टक्के) बँकेत बचत खात्यावर व पोष्ट ऑफीसामध्ये बचत करतात·

बी·२ :

प्राथमिक शिक्षण असलेल्या पंधरा (६८·१८ टक्के) शेतमजुरांमधील आकरा (७३·३३ टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत· तर बचत करणारे सर्व बँकेमध्ये बचत खात्यावर बचत करतात असे दिसून येते·

५·१·२·सी·:

खांडकरी शेतमजुरांच्या बचतीची माहिती त्यांच्या शैक्षणिक गट पातळीनुसार पुढीलप्रमाणे आहे·

सी·१ :

अशिक्षित दोन्ही (४० टक्के) शेतमजूर बचत न करणारे असे आहेत·

सी·२ :

प्राथमिक शिक्षित या गट पातळीतील तीन (६० टक्के) शेतमजुरांमधील दोन (६६·६७ टक्के) बचत न करणारे तर एक (३३·३३ टक्के) शेतमजूर बँकेमध्ये बचत खात्यावर बचत करतो·

शिक्षणाचा बचत करण्याच्या प्रवृत्तीवर काही परिणाम झाल्याचे या विवेचनावरून दिसत नाही· अशिक्षित अल्पभूधारक शेतमजुरात बचत न करणाऱ्यांचे प्रमाण ६३·१५ टक्के आहे· प्राथमिक शिक्षितात ते ५९ टक्के एवढे जरी कमी झाले असले तरी माध्यमिक व उच्च माध्यमिकात ते परत ७२·७२ टक्के इतके वाढले· अशिक्षित भूहीनात बचत न करणाऱ्यांचे प्रमाण ७१·४३ टक्के) व प्राथमिक पातळीचे शिक्षण घेतलेल्यात ते ७३·३३ टक्के आहे·

····१४९/-

खंडकरी शेतमजुरांत अशिक्षितांमध्ये बचत न करणाऱ्यांचे प्रमाण शंभर टक्के आहे. प्राथमिक शिक्षितात ते ६७ टक्के आहे. या सर्वात बँकेत बचत करणाऱ्यांची प्रवृत्ती जास्त आहे ही स्वागतार्ह बाब आहे. पण यावरुन पोष्ट ऑफीस बचत योजना लोकप्रिय करणे किती जरुरीचे आहे हेही दिसून येते.

५.१.३ :

सर्व शेतमजुरांच्या बचतीचे विश्लेषण त्यांच्या जमीनीच्या क्षेत्रफळा-प्रमाणे (१) एक ते तीस आर (२) एकतीस ते साठ आर व (३) ६१ आर ते दोन हेक्टर पर्यंत असे तीन गट पाडून केले आहे.

अल्पभूधारक शेतमजुरांच्या बचतीचे पृथःकरण जमीनीच्या आकारमानाच्या आधारे वरील गटाप्रमाणे पुढील पध्दतीने मांडता येते.

अे.१ :

एक ते तीस आर पर्यंत या क्षेत्रफळाच्या गटामधील ४१ (४४.०९ टक्के) शेतमजुरांपैकी २९ (७०.७३ टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत. सोळा (३९.०२ टक्के) शेतमजूर बँकेत बचत करतात. यामधील एक (६.२५ टक्के) शेतमजूर मुदत खात्यावर व उरलेले सर्व बचत खात्यावर ठेवी जमा करतात. दोन (४.८८ टक्के) शेतमजूर पोष्ट ऑफीसमध्ये तर सहा (१४.६३ टक्के) शेतमजूर भिशीमध्ये बचत करतात.

अे.२ :

एकतीस ते साठ आर पर्यंत जमीनीचे क्षेत्र असलेल्या ३३ (३५.४८ टक्के) शेतमजुरांमधील तेवीस (६९.७० टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत.

आठ (२४·२४ टक्के) शेतमजूर बँकेत बचत करतात· यामधील १२·५० टक्के शेतमजूर मुदत खात्यावर तर उरलेले प्रत्येकी दोन (६·०६ टक्के) शेतमजूर पोष्ट ऑफिस व भिशीमध्ये बचत करतात·

अे·३ :-

६१ आर ते २ हेक्टरपर्यंत जमीन असलेल्या गटातील नऊ (९·६८ टक्के) शेतमजूरात, सहा (६६·६७ टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत· तर बचत करणारे तीन (३३·३३ टक्के) शेतमजूर बँकांमध्ये बचत खात्यावर ठेवी जमा करणारे आहेत·

५·१·३·बी :-

खंडकरी शेतमजुरांच्या बचतीचे पृथःक्करण जमिनीच्या आकार-मानाच्या आधारे वरील गटाप्रमाणे पुढील पध्दतीने मांडता येते·

बी·१ :-

आकरा ते वीस आर या जमीन गटातील एक (२० टक्के) म्हणजे सर्वच्या सर्व शेतमजूर बचत न करणारे आहेत·

बी·२ :-

एकतीस ते पन्नास आर या जमीन गटातील दोन (४० टक्के) शेतमजुरांपैकी एक (५० टक्के) बचत न करणारा तर एक (५० टक्के) बँकेत बचत खात्यावर जमा करणारा आहे·

बी·३ :-

८१ आर ते २ हेक्टर या जमीन गटातील दोन्ही (४० टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत· बचतीच्या कुवतीचा शेतमजुरांकडे असलेल्या जमिनीच्या आकाराशी संबंध लागत नाही· मध्यम जमीन धारणेच्या गटात बचत करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे· तर अल्प व कमाल जमीन धारण करणाऱ्या शेतमजुरात बचत करणाऱ्यांचे प्रमाण कमी नाही·

५·१·४ :-

सर्व शेतमजुरांच्या बचतीचे त्यांच्या कुटुंबाच्या आकारमानानुसार कुटुंबाचे (१) एक ते दोन व तीन व्यक्ती, (२) चार व पाच व्यक्ती, (३) सहा व सहापेक्षा जास्त व्यक्ती असे तीन गट पाडून पुढीलप्रमाणे पृथक्करण केले आहे·

५·१·४·अे·१ :-

अल्पभूधारक शेतमजुरांच्या एक ते दोन व तीन व्यक्ती असणाऱ्या एकोणीस (२०·४३ टक्के) शेतमजूर कुटुंबामधील सात (३६·८४ टक्के) शेतमजूर बचत न करणारे आठ (४२·११ टक्के) शेतमजूर बँकेमध्ये बचत करणारे आहेत· यापैकी सात (८७·५ टक्के) शेतमजूर बचत खात्यावर व उरलेले मुदत खात्यावर बचत करतात तर पोष्ट ऑफिस व भिशीमध्ये बचत करणाऱ्या शेतमजुरांचे प्रमाण अनुक्रमे एक (५·२६ टक्के) व दोन (१०·५३ टक्के) आहे·

··· १५२ /-

५·१·४ अे·२ :

चार व पाच व्यक्ती कुटुंबामध्ये असणा-या ५५(५९·१४ टक्के) शेतमजुरांमधील ४१(७४·५५ टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत· नऊ (१६·३६ टक्के) शेतमजूर बँकेत बचत करतात· यांच्यामधील एक(११·११ टक्के) शेतमजूर बँकेत मुदत खात्यावर बचत करतात· दोन (३·६४ टक्के) शेतमजूर पोष्ट ऑफीसामध्ये तर चार (७·२७ टक्के) शेतमजूर भिशीमध्ये बचत करतात·

५·१·४ अे·३ :

सहा व सहापेक्षा जास्त व्यक्ती कुटुंबाचे आकारमान असणा-या एकोणीस (२०·४३ टक्के) शेतमजुरांमधील दहा (५२·६३ टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत· तर नऊ शेतमजूर बँकेमध्ये बचत खात्यावर बचत करतात· तसेच एक (५·२६ टक्के) व दोन (१०·५३ टक्के) शेतमजूर अनुक्रमे - पोष्ट ऑफीस व भिशीमध्ये बचत करतात·

५·१·४ बी १ :

भूहीन शेतमजुरांपैकी तीन व्यक्तीचे कुटुंब असणा-या दोन - (९·०९ टक्के) शेतमजुरांमधील एक (५० टक्के) बचत न करणारे तर बचत करणारे एकजण भिशीमध्ये बचत करतात·

५·१·४ बी २ :

चार व पाच व्यक्ती कुटुंबाचे आकारमान असणा-या चौदा(६४·३४ - टक्के) शेतमजुरांमधील नऊ (६४·२९ टक्के) शेतमजूर बचत न करणारे तर बचत करणारे सर्व बँकेमध्ये बचत खात्यामध्ये ठेव ठेवतात·

५·१·४ बी ३ :

सहा व सहापेक्षा जास्त व्यक्ती असणारी सहा (२७·२७ टक्के) कुटुंबे बचतन करणारी आहेत·

५·१·४ सी :

खांडेकरी शेतमजुरांमध्ये चार व पाच व्यक्तींचे पाच कुटुंबापैकी चार (८० टक्के) शेतमजूर बचत न करणारे आहेत तर बचत करणारे सर्व बँकेमध्ये बचत खात्यात पैसे जमा करतात·

कुटुंबाच्या आकारमानाचा व बचत करणाऱ्या कुटुंबाच्या संख्येचा अल्पभूधारक शेतमजुरांच्या बाबतीत वेगळाच संबंध आहे· कमी आकारमान असणाऱ्या शेतमजूर कुटुंबात बचत करणाऱ्यांचे प्रमाण (६३·१६ टक्के) असे जास्त आहे तसेच मोठे कुटुंब असणाऱ्या शेतमजुरातही ते प्रमाण जास्त नसले तरी समाधानकारक (४७·३६ टक्के) आहे· पण मध्यम आकाराच्या कुटुंबात मात्र बचत करणाऱ्यांचे प्रमाण तुलनेने कमी (२५·४५ टक्के) आहे· भूहीन शेतमजुरात बचत करणाऱ्या कुटुंबाचा व कुटुंबाच्या आकारमानाचा संबंध सरळ आहे· छोटी कुटुंबे जास्त संख्येने बचत करतात· व कुटुंबाचे आकारमान वाढत जात असता बचत करणाऱ्यांचे प्रमाण घटत असे जाते· खांडकरी शेतमजुरात एकाच गटातील कुटुंबे असल्यामुळे असा संबंध प्रस्थापीत करता येत नाही·

· · · ·

···· १५४/-